गृह -2
जिल्हादंडाधिकारी कार्यालय, बुलडाणा - 443001
दुरध्वनी क्र. 07262-242307/242411 फॅक्स क्र. 07262-242289

वाचा :- 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
2) भारतीय साथरोग अधिनियम 1897
3) सिगरेट व अन्य तंबाखु उत्पादने (जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार,वाणिज्य,उत्पादन,पुरवठा आणि वितरण विनियमन) अधिनियम 2003
4) सार्वजानिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांची अधिसुचना दिनांक 17 मार्च 2020
5) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे आदेश No.DMU/2020/CR.92/ DisM-1 Dated 31 Augast, 2020
6) या कार्यालयाचे आदेश क्रमांक/गृहशाखा/कक्ष4.2/कावि/643/2020 दिनांक 15/04/2020
7) या कार्यालयाचे आदेश क्रमांक/गृहशाखा/कक्ष4.2/कावि/643/2020 दिनांक 01 सप्टेंबर 2020
8) जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. बुलडाणा यांचे पत्र जा.क्र. बुजिप/आरोग्य/माकुमाजबाबदारी/ 16868-71/2020 दिनांक 17/09/2020

---

क्रमांक/गृहशाखा/कक्ष4.2/कावि/1052/2020 दिनांक 17/09/2020

**<u>"माझे कुटुंब माझी जबाबदारी" मोहीम कालावधी आदेश</u>**

ज्याअर्थी, कोवीड -19 या विषाणुजन्य आजारावर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखणसाठी, सार्वजानिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांची अधिसुचना दिनांक 17 मार्च 2020 नुसार मला सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, कोवीड-19 या विषाणुजन्य आजारावर आळा घालण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे आदेश No.DMU/2020/CR.92/ DisM-1 Dated 31 Augast, 2020 व या कार्यालयाचे आदेश क्रमांक/गृहशाखा/कक्ष4.2/कावि/643/2020 दिनांक 01 सप्टेंबर 2020 अन्वये जिल्हयात दिनांक 30 सप्टेंबर 2020 च्या मध्यरात्री पर्यंत टाळेबंदी आदेश (लॉकडाऊन) लागु करण्यात आलेले आहे. सदर आदेशामध्ये कंटेनमेंट झोन मधील कार्यवाही पुर्वी प्रमाणेच पुढील आदेशा पर्यंत सुरुच ठेवणेबाबत निर्देशीत केले आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यामध्ये तसेच जिल्हयामध्ये कोवीड बाधीत रुग्णांची संख्या दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणेवर अतिरिक्त ताण येत असुन, रुग्णांलयामध्ये उपचारांसाठी मर्यादा येत आहेत. अनलॉक प्रक्रीया सुरु असतांना जनजिवन पुर्वपदावर आणण्याबरोबरच कोवीड प्रादुर्भावावर नियंत्रण अधिक प्रभावी करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यामध्ये आणि जिल्हयामध्ये शासन निर्णय सार्वजानिक आरोग्य विभाग दिनांक 12 सप्टेंबर 2020 नुसार माझे कुटुंब माझी जबाबदारी या मोहीमेची पहिली फेरी दिनांक 15/09/2020 ते दिनांक 10/10/2020 या कालावधीत होणार आहे. सदर मोहीमेमध्ये सर्व लोकसंख्येला दोन वेळा घर भेटी देऊन संशयीत कोवीड रुग्ण शोधणे तसेच मधुमेह,ह्दयविकार, किडनी आजार, लठठपणा यासारख्या कोमॉरबीड व्यक्ती शोधणे, त्यांची तपासणी करणे, उपचार करणे इत्यादींचा अंतर्भाव आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. बुलडाणा यांनी त्यांचे वाचा मधील पत्र दिनांक 17/09/2020 नुसार कळविले आहे की, सदर मोहीम सुरु असतांना लोक घरी नसल्यामुळे सर्वक्षणास बाधा निर्माण होत असल्याने लोकांना घरी थांबविणे बाबत कार्यवाही होणेबाबत विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, वाचा मधील क्रमांक 4 नुसार तंबाखुजन्य पदार्थ जाहिरात व कलम 6 अ नुसार शैक्षणिक संस्थेचे परिसरात विक्रीस बंदी, धुम्रपान बंदी यासाठी दंडाची तरतुद करण्यात आलेली आहे.

जिल्हादंडाधिकारी कार्यालय, बुलडाणा (महा.)

जिल्हादंडाधिकारी कार्यालय, बुलडाणा - 443001
दुरध्वनी क्र. 07262-242307/242411 फॅक्स क्र. 07262-242289

आणि ज्याअर्थी वाचा मधील आदेश क्र. 5 मधील जोडपत्र -I व जोडपत्र - II मध्ये दिलेल्या निर्देशांचे जिल्हयातील नागरीकांकडुन तंतोतंत पालन होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे जिल्हयात कोरोना बाधीत रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत आहे. तसेच वाचा मधील आदेश क्रमांक 6 दिनांक 15/04/2020 नुसार सार्वजानिक थुंकण्यास बंदी घालण्यात आली असुन, सार्वजानिक ठिकाणी चेह-यावर मास्क वापरणे, सोशल डिस्टंसिंगचे पालन करणे इत्यादी बाबींचे पालन न केल्यास दंडात्मक व फौजदारी कार्यवाही करणे बाबत आदेश पारीत करण्यात आलेले आहे. परंतु जिल्हयात सदर आदेशांचे पालन होत नसल्याचे दिसुन येत आहे. तसेच संबंधीत यंत्रणेकडुन दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येत नसल्याबाबत दिसुन येत आहे. सदर रोगावर आळा घालण्याचे दृष्टीने जिल्हयात सदर आदेशाचे तंतोतंत पालन करण्याचे दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. माझे कुटुंब माझी जबाबदारी हि मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी पहिल्या टप्यामध्ये दिनांक 18/09/2020 ते 30/09/2020 या कालावधीमध्ये वाचा मधील कायदे व आदेशांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी मी एस. राममुर्ती, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बुलडाणा, मला वाचा मधील क्रमांक 1 ते 5 नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

1) आदेशाच्या कालावधीमध्ये नागरीकांनी महत्वाच्या कामाव्यतिरिक्त घराबाहेर पडु नये. सर्वक्षणाचे वेळी घरी नसल्यामुळे धोका ओळखता येत नसल्याने हि बाब सर्वेक्षणासाठी असहकार्य असल्याचे समजण्यात येऊन, नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

2) या कार्यालयाचे आदेश क्रमांक/गृहशाखा/कक्ष4.2/कावि/643/2020 दिनांक 01 सप्टेंबर 2020 मध्ये जोडपत्र- I मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कोणत्याही कारणासाठी सार्वजानिक ठिकाणी वावरतांना तिन पदरी मास्क किंवा साधा कापडी मास्क किंवा रुमाल/कापडाने नाक व तोंड झाकुन वावरणे बंधनकारक असेल.

3) कोवीड -19 रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यकते प्रमाणे अत्यावश्यक सेवा वगळता, दुकाने/आस्थापना/प्रतिष्ठाणे बंद ठेवण्यासाठी व्यापारी संघटना/नागरीक संघ/खाजगी संस्था यांना आवाहन करण्यात येते की, दिनांक 30/09/2020 पर्यंत आपआपली दुकाने/आस्थापना इत्यादी बंद ठेवुन मोहीमेस सहकार्य करावे.

4) या कार्यालयाचे आदेश क्रमांक/गृहशाखा/कक्ष4.2/कावि/643/2020 दिनांक 01 सप्टेंबर 2020 मध्ये जोडपत्र- I मध्ये दिलेल्या निर्देशानुसार, सर्व नागरीकांनी सोशल डिस्टंसिंगचे पालन करावे. दुकानचालक/मालक यांनी दुकाने उघडी ठेवल्यास सोशल डिस्टंसिंगचे पालन करुन एकावेळी 5 पेक्षा जास्त ग्राहकांना प्रवेश देण्यात येऊ नये. कामाचे/व्यवसायाचे ठिकाणी थर्मल स्क्रिनींग करणे, हात धुणे, सॅनिटायझरचा वापर करणे इत्यादीं बंधनकारक राहील. तसेच नियमांचे पालन न केल्यास स्थानीक स्वराज्य संस्थानी दंडनिय कार्यवाही करावी.

5) या कार्यालयाचे आदेश क्रमांक/गृहशाखा/कक्ष4.2/कावि/643/2020 दिनांक 15/04/2020 मध्ये सार्वजानिक थुंकण्यास बंदी घालण्यात आली असुन, सार्वजानिक ठिकाणी चेह-यावर मास्क वापरणे, सोशल डिस्टंसिंगचे पालन करणे इत्यादी बाबींचे पालन न केल्यास, शहरी भागात संबंधीत मुख्याधिकारी नगर परिषद व ग्रामीण भागात मुख्यकार्यकारी जि.प. बुलडाणा यांनी जागोजागी चेक नाके उभारुन, मोहीम स्वरुपात दिनांक 30 सप्टेंबर 2020 पर्यंत जिल्हयातील नागरीकांनी उपरोक्त् बाबींचे पालन न केल्यास दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी. यासाठी (अ) सार्वजानिक ठिकाणी थुंकणे, मास्क न वापरणे इत्यादींसाठी 500/- रु. दंड आकारावा. (ब) सोशल डिस्टंसिंकचे पालन न केल्यास ग्राहकासाठी रु. 500/- आणि दुकान मालक यांना रु. 1500/- एवढा दंड करण्यात यावा.

6) सदर आदेशाची प्रभावी अंमलबाजवणी होण्यासाठी नगरपालिका व ग्रामपंचायत यांनी आपआपले कार्यक्षेत्रामध्ये पथकांची नियुक्ती करुन, दंडनिय कार्यवाही करावी. पोलीस प्रशासनाने पथकांसोबत आवश्यक तो पोलीस बंदोबस्त दयावा.

जिल्हादंडाधिकारी कार्यालय, बुलडाणा (महा.)
सत्यमेव जयते

जिल्हादंडाधिकारी कार्यालय, बुलडाणा - 443001
दुरध्वनी क्र. 07262-242307/242411 फॅक्स क्र. 07262-242289

7) शासनाचे निर्देशानुसार, जिल्हयामध्ये कोवीड -19 च्या अनुषंगाने, माझे कुटुंब माझी जबाबदारी ही मोहीम राबविण्यात येत असुन, यामध्ये नागरीकांची घरोघरी तपासणी करण्यात येणार असुन, सदर तपासणी दरम्यान नागरीकांनी घरीच थांबावे व तपासणी करणा-या पथकास योग्य ते सहकार्य करावे.

8) 65 वर्षावरील व्यक्ती, कोमॉर्बीड व्यक्ती, गरोदर माता आणि 10 वर्षाखालील मुले यांनी वैदयकीय तथा अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर पडु नये.

कायदेशीर तरतुदीनुसार आदेशाचे पालन न करणा-या व्यक्तींवर दंडनिय तसेच फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही संबंधीत यंत्रणेने करावी. सदर आदेशाची अंमलबाजवणी संबंधीत यंत्रणेने न केल्यास त्यांचे वर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल्. सदर आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बंधाची किंवा सदर आदेशाची अवज्ञा करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा संघटना हि, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, भारतीय साथरोग अधिनियम 1897 व भारतीय दंडसंहिता, (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

सदर आदेश जिल्हयातील सर्व जनतेला उद्देशुन काढण्यात येत असुन, सदरचे आदेश प्रसिध्द झाल्या पासुन लागु करण्यात आले असे समजण्यात येईल.

(एस. राममुर्ती)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
बुलडाणा

जिल्हादंडाधिकारी कार्यालय, बुलडाणा (महा.) सत्यमेव जयते

**प्रतिलीपी :-**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.बुलडाणा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
2. जिल्हा शल्य चिकित्सक, सा.रु. बुलडाणा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
3. जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. बुलडाणा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
4. पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांना माहीती तथा उचित कार्यवाहीसाठी
5. जिल्हा माहीती अधिकारी बुलडाणा

   ....सदर माहीतीस बातमीच्या स्वरुपात प्रसिध्दीकरीता विनामुल्य व्यापक प्रसिध्दी दयावी.
6. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर विकास विभाग, जि.का.बुलडाणा यांना माहीती तथा उचित कार्यवाहीसाठी
7. उपविभागीय अधिकारी -------------------------------- (सर्व) यांना माहीती तथा उचित कार्यवाहीसाठी
8. तहसिलदार -----------------------------------------(सर्व) यांना माहीती तथा उचित कार्यवाहीसाठी
9. विभाग प्रमुख ---------------------------- (सर्व) यांना माहीती तथा उचित कार्यवाहीसाठी.
10. मुख्याधिकारी नगर परिषद/नगर पंचायत ----- (सर्व) यांना माहीती तथा उचित कार्यवाहीसाठी

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
बुलडाणा